**<u>सं. फौ. ख. क्र. १/२०२४</u>**
**<u>निशाणी क्र.१२</u>**

**<u>फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र. १</u>:**

कारणे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

नांव :– श्री. बाळासाहेब खुशाबा डोळस
वय :– ५९ वर्षे,
धंदा :– सेवानिवृत्त.
राहणार :– धनकवडी, पुणे.

**<u>फिर्यादीतर्फे वकील श्रीमती अनुराधा पडवळ यांच्यामार्फत सुरु</u> :–**

०१. दिनांक २४.०४.२०२३ रोजी मी बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय येथे कार्यरत असताना श्री. शहा यांचा तक्रारी अर्ज कार्यालयास प्राप्त झाला होता.आता मला श्री. सुनिल शहा यांचा दिनांक १९.०४.२०२३ रोजीचा तक्रारी अर्ज दाखवण्यात आला. सदर तक्रारी अर्जाची मुळ प्रत असल्याने त्यास **निशाणी १३** देण्यात आली. सदर ठिकाणी जाऊन मी घटनास्थळाचा पंचनामा केला. आता मला तो पंचनामा दाखवण्यात आला तो तोच असुन त्यावर माझी व पंचांची सही आहे व त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर पंचनम्यास **निशाणी १४** देण्यात आली. सदर ठिकाणी विनापरवाना एकुण ५ वृक्षांची तोड करण्यात आलेली होती. घटनास्थळावर बांधकाम परवानगी देण्यापुर्वी पुणे महानगरपालिकेची परवानगी घेत असताना त्यामध्ये ५ वृक्षांचा उल्लेख करण्यात आलेला होता व मंजुर नकाशामध्ये देखील सदर ५ झाडे दर्शविण्यात आलेली आहे. सदरची एनओसी दिनांक ०५.०७.२०११ रोजी देण्यात आलेली होती व दिनांक २५.०७.२००२ रोजी नकाशा मंजुर करण्यात आला होता. सदर घटनेबाबत मी कार्यालयाकउे अहवाल सादर केला होता. आता मला अहवाल दाखवण्यात आला तो तोच अहवाल आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. अहवालास **निशाणी १५** देण्यात आली. आरोपी यांना दिनांक २८.०४.२०२३ व ०२.०६.२०२३ रोजी नोटीस पाठविण्यात आली होत्या. सदर नोटीसच्या स्थळप्रती असल्याने त्यास **निशाणी १६ व १७** देण्यात आली. सदर नोटीसला खुलासा सादर न केल्याने आरोपीविरूद्ध प्रस्तुतची फिर्याद दाखल करण्यात आलेली आहे. सदर फिर्याद दाखल करण्याबाबत मला अधिकार पत्र देण्यात आले होते.

**सरतपास पुर्ण...**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. ए. एस. क्षीरसागर यांच्यामार्फत सुरु</u> :–**

०२. मी घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी दुपारी १२ ते १ च्या दरम्यान गेलो होतो. तक्रारी अर्ज दोन दिवस आधी कार्यालयास प्राप्त झाला होता. कार्यालय ते घटनास्थळ यामध्ये सुमारे एक ते दिड किलामीटर अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे रहिवासी व वर्दळीचे ठिकाण आहे. घटनास्थळी गेल्यावर मी पाच ते दहा मिनीटांनी पंचनामा करण्यास सुरूवात केली. मी घटनास्थळी जाण्यापुर्वी कार्यालयातील हालचाल रजिस्टर मध्ये त्याबाबतची नोंद केलेली नव्हती. पंचनाम्यामध्ये लिहिलेले झाडांचे वर्णन मी सन २०१२ मध्ये दिलेल्या एनओसी च्या आधारे लिहिलेले आहे. वृक्षतोड नेमकी किती तारखेला करण्यात आली होती त्याबाबतची तारीख अगर वेळ याबाबतचा उल्लेख पंचनामा, अहवाल अगर फिर्याद मध्ये नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यामध्ये वृक्षतोड करण्याकरीता वापरण्यात आलेल्या साधनाचा उल्लेख करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ वरील वृक्षतोड झाल्याबाबत लाकुडफाटा अगर त्यासाठी वापरलेले साधन याचा उल्लेख पंचनामा, अहवाल व फिर्याद मध्ये नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुळ तक्रारदार यांनाच पंच क्र. १ म्हणुन घेण्यात आलेले होते. पंच क्र.२ या पंच क्रमांक १ यांच्या पत्नी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पंच क्रमांक १ श्री. सुनिल शहा हेच घटनास्थळवरील जागेचे पुर्वी मालक होते. हे म्हणणे खरे आहे की, मी कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा अगर घटनास्थळाच्या आजुबाजूला राहणाऱ्या व्यक्तींचा जबाब नोंदविलेला नाही. मी दिनांक २४.०४.२०२३ रोजी पंच सुनिल शहा यांचा जबाब नोंदवुन घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा व जबाब यामध्ये सुनिल शहा यांनी वेगवेगळे पत्ते लिहिलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, नोटीस निशाणी १६ व १७ आरोपींना प्राप्त झालेबाबत कोणतीही पोहोच अगर इतर कागदोपत्री पुरावा मी सादर केलेला नाही. आरोपी यांनी घटना ठिकाणाची जागा विकत घेतल्यानंतर त्या ठिकाणी वृक्ष अस्तीत्वात होते किंवा नाही हे दाखविण्याकरीता माझ्या कडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. फिर्याद सोबत जे फोटो दाखल केलेले आहेत ते मी काढलेले नाहीत. मी पंचनामा करण्याकरीता गेल्यानंतर माझी कोणीही अडवणुक केली नाही. हे म्हणेणे खरे आहे की, एनओसी मध्ये लिहिलेले झाडांचे वर्णन व वय व पंचनाम्यामध्ये लिहिलेल्या झाडांचे वर्णन व वय सारखेच आहे. हे म्हणणे

खरे नाही की, पंचनाम्यामध्ये नमूद झाडांची नैसर्गीक रित्या वाढ झालेली नसल्याने ती नष्ट झाली. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार यांनी सांगितल्या प्रमाणे पंचनामा तयार करण्यात आला.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

| | समक्ष, | श्रवणोत्तर स्वीकृत, |
|---|---|---|
| | SAYYAD NAJMEEN SALIMSHA Digitally signed by SAYYAD NAJMEEN SALIMSHA Date: 2026.03.24 12:41:08 +0530 | SAYYAD NAJMEEN SALIMSHA Digitally signed by SAYYAD NAJMEEN SALIMSHA Date: 2026.03.24 12:41:15 +0530 |
| ठिकाणः पुणे | **(श्रीमती एन. एस. सय्यद)** | **(श्रीमती एन. एस. सय्यद)** |
| दिनांकः २३/०३/२०२६. | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, |
| | (मनपा न्यायालय), जि. पुणे. | (मनपा न्यायालय), जि. पुणे. |